अधिसूचना

क्रमांक : ३२/२०२४ दिनांक : २८-०३-२०२४

विषय : पी.एच.डी कोर्सवर्क परीक्षेचे प्रश्नसंच तयार करणे व उत्तरपत्रिकांचे मूल्यांकनाचे करीता मानधन / पारिश्रमिक दराबाबत.

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता सूचित करण्यात येते की, दिनांक २३/०१/२०२४ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीने विषय क्रमांक ३ अन्वये पी.एच.डी. कोर्सवर्क च्या उत्तरपत्रिका मूल्यांकन तसेच प्रश्नसंच तयार करण्याकरीता परीक्षकांना द्यावयाचे मानधन / पारिश्रमिक दरासंदर्भात केलेल्या शिफारसीस, दिनांक १७/०२/२०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेने बाब क्र. 30(c) नुसार मान्यता प्रदान केलेली आहे. सदर दर व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या दिनांकापासून लागु राहील. सदर कामाकरीता खालील स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविलेले दर देय राहिल.

सर्व विद्याशाखांच्या पी.एच.डी. कोर्सवर्क करीता तयार करण्यात येणारे प्रश्नसंच व उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी परिक्षकांना द्यावयाचे मानधन / पारिश्रमिकांचे दर.

अ.क्र.	कामाचे स्वरूप	दर रु.
१	२	३
१	वर्णनात्मक (Descriptive) प्रश्नसंच व बहुपर्यायी (multipal Choice question) प्रश्नसंच काढण्यासाठी	रु. ४००/- प्रति प्रश्नपत्रिका
२	उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी परीक्षकांना द्यावयाचे मानधन / पारिश्रमिकांचे दर	रु. १५/- प्रति पेपर

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती